महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम आय डी सी एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०

दूरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ | कार्यालय (०२३३) २२३१२६९

Email : gpmiraj@gmail.com | Website : www.gpmiraj.ac.in

जा.क्र.शातंमि/आस्था/संप/२०२३/४९८ | दिनांक- १५/०३/२०२३.

परिपत्रक -

विषय- दिनांक १४/०३/२०२३ पासून बेमुदत संपाबाबत.

संदर्भ- १.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक दिनांक १३/०३/२०२३

२.मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांचेकडील परिपत्रक क्रं.साशा-१/कार्या-१/प्रशा/आरआर/४७१/२०२३ दिनांक १४/०३/२०२३

३.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रं.१२/आस्था(२)/२०२३/२०७ दिनांक १३/०३/२०२३

४.मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडील परिपत्रक तंशिविकापु/आस्था-३(अ)/संप/२०२३/१२३४ दिनांक १३/०३/२०२३

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकांच्या अनुषंगाने संस्थेतील सर्व तृतिय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना कळविण्यात येते की, दिनांक १४/०३/२०२३ पासून बेमुदत संपाबाबत संदर्भीय परिपत्रकातील सूचनांचे पालन करावे. अन्यथा नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रति - सर्व विभागप्रमुख यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

२/- सदरचे परिपत्रक आपले विभागातील सर्व तृतिय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांचे निदर्शनास आणून दयावे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. स्थापत्य विभाग | २. यंत्रविभाग | ३. संगणक विभाग | ४. पॉलिमर टेक्नॉलॉजी |
| ५. मेडिकल इले. विभाग | ६. कर्मशाळा | ७. विज्ञान व मानव्यशास्त्र | ८. उपयोजित यंत्रशास्त्र |
| ९. कार्यालय | १०. ग्रंथालय | ११. विद्युत | |

प्रत - श्री वि. र. फलमारी, समन्वयक वेबसाईट संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

दिनांक १४ मार्च, २०२३ पासून राज्यव्यापी "बेमुदत संप"
आंदोलना संदर्भात करावयाची कार्यवाही....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५२२/प्र.क्र.३६/१६-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ मार्च, २०२३

## परिपत्रक

बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक १४ मार्च,२०२३ पासून राज्यव्यापी "बेमुदत संप" आंदोलन संदर्भाबाबत शासनास नोटीस दिली आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९, मधील नियम क्रमांक ६ अनुसार शासकीय कर्मचाऱ्याने कोणत्याही संप/निर्दशनामध्ये सहभागी होऊ नये असे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक २९ अन्वये बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना यांना मान्यता देण्यात आली आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र ही शासन मान्यता प्राप्त संघटना नाही. तथापि,राज्यव्यापी संपामध्ये राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांच्या दिनांक १४ मार्च, २०२३ पासूनच्या राज्यव्यापी बेमुदत संप आंदोलना दिवशी, शासकीय/ निमशासकीय कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग/ तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत :-

अ) शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व कर्मचारी यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत शासनाच्या प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) कर्मचाऱ्यांनी संपात सहभागी न होता, नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा.

क) संप काळात कार्यालय नियमित वेळेवर उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व ती व्यवस्था जबाबदार अधिकारी यांचेकडे दयावी. आवश्यकता भासल्यास गृहरक्षक/पोलिस दलाची मदत घ्यावी.

ड) विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडून जावू नये.

इ) विभागप्रमुखांनी /कार्यालय प्रमुखांनी या आदेशाच्या दिनांकापासून संप संपेपर्यत कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये आणि जे कर्मचारी रजेवर असतील

अशा प्रत्येक प्रकरणी विचार करुन त्यांची रजा रद्द करुन त्यांना कामावर तात्काळ बोलवावे किंवा कसे ते ठरवावे.

ई) शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे "काम नाही वेतन नाही" हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचा-यांना अवगत करावे.

फ) संपामध्ये सहभागी झाल्यामुळे त्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो याची सर्व संबंधितांना स्पष्ट सूचना देण्यात यावी.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये संप काळात अत्यावश्यक व इतर सेवा सुरळीत चालू राहतील याबाबत उपाययोजना कराव्यात.

५. सदर संप कालावधीमध्ये कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचारी यांची माहिती क्षेत्रिय कार्यालयांनी त्यांचेशी संबंधित मंत्रालयीन विभागांना कळवावी व मंत्रालयीन विभागाने त्यांच्या विभागाची माहिती दुपारी १२.०० वाजेपर्यत व अधिपत्याखालील कार्यालयांची संकलित माहिती दुपारी २.०० वाजेपर्यत या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,४ था मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे सादर करावी. तसेच ईमेल पत्ता **desk16a.gad-mh@gov.in** या ई-मेलवरही अचूक पाठवावी. यापूर्वी असे निदर्शनास आले आहे की, कर्मचारी यांच्या उपस्थितीची कार्यालयनिहाय माहिती विहित वेळेवर उपलब्ध करुन देत नाहीत. तेव्हा यावेळी काळजीपूर्वक सदर माहिती विहित कालमर्यादेत देण्याची व्यवस्था करावी.

६. सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात संपाच्या कालावधीत उपस्थितीची माहिती दुपारी ०१.०० वाजेपर्यत या विभागाकडे अचूक पाठवावी. तसेच संपाच्या कालावधीतील उपस्थितीची टक्केवारी दुपारी ०१.०० वाजेपर्यत या विभागाकडे अचूक प्राप्त होईल अशाप्रकारे पाठवावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०३१३१८२६३०१३०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

SURYAWANSHI
SAMPAT DASHARATH

(सं. द. सुर्यवंशी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई.
मा.सर्व सन्माननिय संसद/विधानपरिषद /विधानसभा सदस्य
मा.मुख्य सचिवांचे स्वीय सहायक

दिनांक १४ मार्च, २०२३ पासून राज्यव्यापी " बेमुदत संप " आंदोलना संदर्भात करावयाची कार्यवाही....

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सांगली
(सामान्य शाखा)
क्र.साशा-१/कार्या-१/प्रशा/आरआर/ ४७१/२०२३
दि. १४.०३.२०२३

## प रि प त्र क

मा. सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संघटना १५१२/प्र.क्र.३६/१६-अ, दि. १३ मार्च, २०२३ तसेच या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.साशा-१/कार्या-१/प्रशा/आरआर/४७०/२०२३, दि. १३.०३.२०२३ चे अवलोकन करावे.

बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र यांनी राज्य सरकारी कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित मागण्यासंदर्भात दिनांक १४ मार्च, २०२३ पासून राज्यव्यापी "बेमुदत संप" आंदोलन संदर्भाबाबत शासनास नोटीस दिली आहे.

तरी संपकाळात शासकीय/ निमशासकीय कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व शासकीय / निमशासकीय विभाग तसेच अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आलेल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करणेत यावे.

(अ) शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व कर्मचारी यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत शासनाच्या प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

(ब) कर्मचा-यांनी संपात सहभागी न होता नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न करावा.

(क) संप काळात कार्यालय नियमित वेळेवर उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व व्यवस्था जबाबदार अधिकारी यांचेकडे द्यावी. आवश्यकता भासल्यास गृहरक्षक / पोलिस दलाची मदत घ्यावी.

(ड) विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुखानी संप काळात आपले मुख्यालय सोडून जावू नये.

(इ) विभाग प्रमुखानी / कार्यालय प्रमुखांनी या परिपत्रकाच्या दिनांकापासून संप संपेपर्यंत कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये आणि जे कर्मचारी रजेवर असतील अशा प्रत्येक प्रकरणी विचार करुन त्यांची रजा रद्द करुन त्यांना कामावर बोलवावे किंवा कसे ते ठरवावे.

(ई) शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे " काम नाही वेतन नाही " हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचा-यांना अवगत करावे.

फ) संपामध्ये सहभागी झाल्यामुळे त्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो याची सर्व संबंधितांना स्पष्ट सूचना देण्यात यावी.

सर्व शासकीय / निमशासकीय जिल्हास्तरीय विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयात संपाच्या कालावधीत उपस्थितीची माहिती सकाळी ११.०० पर्यंत त्यांच्याशी संबंधीत मंत्रालयीन विभागांना कळवावी व त्याची प्रत या कार्यालयाकडील ईमेल आयडी sanglirdc@gmail.com तसेच sangliweb@gmail.com व mahsan@nic.in यावर तसेच खालील नमुन्यात माहिती सादर करणेत यावी.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | एकुण कर्मचा-यांची (संख्या) | पूर्व परवानगीने रजेवर असलेले कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले कर्मचारी (संख्या) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

(डॉ. राजा दयानिधी, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी सांगली

प्रति,

१. सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख
२. सर्व शाखा प्रमुख, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली
३. सर्व उपविभागीय अधिकारी
४. सर्व तहसिलदार
५. सर्व अपर तहसिलदार

## -------------- यांचे कार्यालय

Email:- दुरध्वनी क्रं.

क्रं.मह/आस्था५/कावि/ /२०२३ दिनांक १४ / ०३ / २०२३

कारणे दाखवा नोटीस

प्रति,

---------------------------

---------------------------

---------------------------

विषय:- कर्तव्यातील कसुरी व गैरवर्तणुकीबाबत

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक ६ नुसार शासकीय कर्मचाऱ्याने कोणत्याही संप/निदर्शनेमध्ये सहभागी होऊ नये असे निर्देश देणेत आले आहेत. शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रमांक संघटना १५२२/प्र.क्र.३६/१६-अ दिनांक १३ मार्च, २०२३ अन्वये दिनांक १४ मार्च, २०२३ पासून विविध संघटनांनी पुकारलेल्या बेमुदत संपाचे अनुषंगाने करावयाच्या कारवाईबाबतचे निदेश दिले आहेत.

वरीलप्रमाणे निर्देश असताना तुम्ही दिनांक १४/०३/२०२३ पासून सुरु झालेल्या बेमुदत संपात सहभागी झालेचे स्पष्ट झाले असून ही बाब वरील तरतुदींचे अनुषंगाने गैरवर्तणुक म्हणून समजणेत येईल. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३/०३/२०२३ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ३ ई) नुसार "काम नाही वेतन नाही" हे धोरण राज्य शासनाने अंगिकारले आहे. तसेच मुद्दा क्रमांक ३ फ) नुसार संपामध्ये सहभागी झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो. याची जाणीव करुन देणेत आलेली आहे.

वरील तरतूदींस अनुलक्षून आपणाविरुध्द शिस्तभंगाची कारवाई कां प्रस्तावित करु नये? याचा लेखी खुलासा नोटीस मिळालेपासून ४८ तासात करणेत यावा. तसेच संपात सहभागी न होता तात्काळ कर्तव्यावर हजर व्हावे अन्यथा "काम नाही वेतन नाही" या धोरणानुसार कारवाई करणेत येईल. तसेच संपाबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी घेणेत येणाऱ्या निर्णयानुसार कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-[illegible]
ई-मेल-desk12@dtemaharashtra.gov.in, संकेतस्थळ: http://www.dtemaharashtra.gov.in

दिनांक 13 MAR 2023

परिपत्रक : क्रमांक : १२/आस्था(२)/२०२३/२०५४

संदर्भ : असो. ऑफ क्लास थ्री मिनिस्ट्रीयल एम्प्लॉईज ऑफ दि डिपार्टमेंट ऑफ टेक्नीकल एज्युकेशन इन ग्रेटर मुंबई यांचे पत्र दि.०८/०३/२०२३

महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने "जुनी पेन्शन योजना मिळणेबाबत व इतर सर्व महत्त्वाच्या मागण्या मिळविण्यासाठी" राज्यभर सर्व शासकीय कर्मचारी दिनांक १४ मार्च २०२३ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे संदर्भीय पत्रान्वये या संचालनालयास कळविले आहे.

संपकाळात शासनाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित केल्या जातात. त्यामध्ये शासकीय/ निमशासकीय कर्मचा-यांनी संपात भाग घेणे गैरवर्तणूक बाब समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे काम नाही वेतन नाही हे धोरण राज्य शासनही अनुसरत आहे, अशी तरतूद आहे.

यास अनुसरून तंत्रशिक्षण संचालनालयातंर्गत सर्व राज्य सरकारी तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधीत तृतीय/ चतुर्थ कर्मचा-यांनी दिनांक १४ मार्च २०२३ पासून बेमुदत संपात सहभागी न होता कर्तव्यावर उपस्थित राहावे. अन्यथा शासकीय कर्मचा-यांनी संपात भाग घेणे गैरवर्तणूक बाब समजण्यात येवून अशा कर्मचा-यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच उपरोक्त कार्यकाळात कोणत्याही कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही व संपात सहभागी झाल्यास "काम नाही वेतन नाही" या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद म.मोहितकर)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

प्रत- आवश्यक त्या माहिती व कार्यवाहीसाठी

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर व
सचिव, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

२) असो. ऑफ क्लास थ्री मिनिस्ट्रीयल एम्प्लॉईज ऑफ दि डिपार्टमेंट ऑफ टेक्नीकल एज्युकेशन इन ग्रेटर बॉम्बे, मुंबई, नोंदणी क्रमांक — जीएडी आरजीए -१०६८-जे, दि.१३.७.१९६८

३) कार्यासन अधिकारी, सर्व कार्यासने, मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हे परिपत्रक त्यांच्या कार्यासनातील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. तसेच संपात सहभागी होण्यापासून परावृत्त करावे. सदर परिपत्रक त्यांचे निदर्शनास आणल्यानंतर तशी त्यांची स्वाक्षरी घ्यावी. तसेच संपकाळात मुख्यालय सोडून जावू नये व कार्यासनातील कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये.

४) कार्यासन क्रमांक १२ निवडनस्ती

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/संप/२०२३/१२३४

दिनांक : १३/०३/२०२३

## परिपत्रक

**विषय- दिनांक १४/०३/२०२३ पासून बेमुदत संपाबाबत.**

संदर्भ- तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक १२/आस्था(२)/२०२३/२०७,
दि. १३/०३/२०२३

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने, जुनी पेन्शन योजना मिळणेबाबत व इतरही सर्व महत्वाच्या मागण्या मिळविण्यासाठी सर्व तृतीय व चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचारी दिनांक १४/०३/२०२३ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे कळविण्यात आले आहे. सोबत परिपत्रक जोडले आहे. सर्व संबधित तृतीय व चतुर्थ कर्मचाऱ्यांनी सोबत जोडलेल्या परिपत्रकातील सूचनांचे पालन करावे. अन्यथा नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत -वरीलप्रमाणे

**प्रत - सर्व संस्था प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१) प्राचार्य / उपसचिव,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था /कार्यालय

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.